जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५६७ दिनांक - २२/०८/२०२२**

# अनोळखी व्यक्तीच्या खुनाचा गुन्हा ४८ तासात उघड, सर्व आरोपी अटक, भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी

दिनांक १९/०८/२०२२ रोजी दही हंडीचे दिवशी भारती विदयापीठ पोलीसांना दरीपुलाचे खाली पिलर लगत एका अनोळखी इसमाचा मृतदेह जखमी अवस्थेत मिळून आला. सदर अनोळखी इसमाचे बाबतीत काही एक माहीती मिळून येत नसल्याने तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप निरीक्षक शिंदे यांनी सदर अनोळखी मृतदेहाचा फोटो व त्याचे वर्णन व्हॉटसअॅपवर टाकून सदरची माहीती पोलीस ग्रुप व त्यांचे परिचयाचे वॉटसअॅप ग्रुपवर प्रसारीत केली.

सदर अनोळखी मयताचे दिनांक २०/०८/२०२२ रोजी ससून हॉस्पिटल येथे पोस्टमार्टम झालेवर पोलीस स्टेशनचे अंमलदार धनाजी पोपट धोत्रे यांनी अज्ञात इसमाचे विरुध्द फिर्याद दिल्याने भारती विदयापीठ पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ५४३/२०२२ भादवि कलम ३०२,२०१ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

दिनांक २१/०८/२०२२ रोजी दुपारी १५/३० वा. चे सुमारास व्हॉटसअॅप ग्रुपवर प्रसारीत केलेली माहीती पाहून मयताचा भाऊ विजय गणपती दुपारगुडे, रा.म्हाळुंगे पुणे हे पोलीस स्टेशन येथे आले व अनोळखी मयत इसम हा त्यांचा धाकटा भाऊ महादेव गणपती दुपारघुडे असे असल्याचे सांगितले. भारती विदयापीठ पोलीस स्टेशनचे **वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जगन्नाथ कळसकर** व पोलीस निरीक्षक विजय पुराणिक यांनी तपास पथकाच्या तीन टिम तयार करुन वेगवेगळया भागात पाठवून दिल्या.

**तपास पथकाचे अधिकारी नितीन शिंदे, पोलीस कर्मचारी आशिष गायकवाड, मितेश चोरमोले, अभिनय चौधरी व रविंद्र चिप्पा** यांनी गोपनिय बातमी व तांत्रीक विश्लेषणच्या आधारे इसम नामे तुषार दिलीप मेटकरी रा. केशव नगर मुंढवा पुणे यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने उडवा उडवीची उत्तरे दिली. त्याचेकडे सखोल तपास केला असता त्याने सांगितले की, “मयत इसम महादेव दुपारगुडे हा नात्याने चुलत मेहुणा लागत असून, तो माझी पत्नी सौ. आशा मेटकरी हिचेवर वाईट नजर ठेऊन होता, तो तीला वांरवार त्रास देत होता. तसेच तीचेशी अश्लिल बोलणे करत होता, त्यास आम्ही बरेच वेळा समजाऊन सांगितले परंतु तो ऐकत नव्हता म्हणुन दिनांक १९/०८/२०२२ रोजी दहीहंडीचे दिवशी फोन करुन त्यास पत्नीचे घरी वडगाव धायरी येथे नेले व समजाऊन सांगितले परंतु तो ऐकत नसल्याने त्यास मी व माझे दोन मेहुणे विनोद दुपारगुडे, किरण चौधरी व पत्नी आशाने त्यास मारहाण केली व रिक्षाने जांभुळवाडी दरीपुलाचे खाली ठेऊन निघून गेलो”, अशी हकिकत सांगितली. त्यानंतर लागलीच **तपास पथकाचे कर्मचारी अवधुत जमदाडे, विक्रम सावंत व गणेश भोसले** यांनी उर्वरीत आरोपी विनोद दुपारगुडे व किरण चौधरी यांना वडगाव धायरी व नांदेड फाटा येथून ताब्यात घेतले. त्यांचेकडे केलेल्या तपासात त्यांनीच सदर गुन्हयाची कबुली दिल्याने **आरोपी नामे १. तुषार दिलीप मेटकरी वय ३३ वर्षे, रा.स.नं.२९/१ केशव नगर, द्वारका पार्क, कोदरे कॉलनी, केआरबी वर्कशॉप पुणे. २. विनोद विष्णु दुपारगुडे वय ३४ वर्षे, रा. गल्ली नंबर १४, गारमाळ, आंबेडकर नगर, वडगाव धायरी पुणे, ३. किरण अंकुश चौधरी वय ४३ वर्षे, रा.नांदेड फाटा, जाधव नगर, गोसावी वस्ती गणपती मंदीर जवळ पुणे व ४. आशा तुषार मेटकरी वय ३२ वर्षे, रा.केशवनगर मुंढवा पुणे** यांना गुन्हा घडल्यापासून अनोळखी मयत इसमाची ओळख पटवून ४८ तासाचे आत अटक करण्यात आलेली आहे. पुढील तपास सहा.पोलीस निरीक्षक अमोल रसाळ करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. सागर पाटील, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ०२, पुणे शहर, श्रीमती सुषमा चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री. जगन्नाथ कळसकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्रीमती संगिता यादव, पोलीस निरीक्षक (गुन्हे), विजय पुराणिक पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप-निरीक्षक शिंदे, धिरज गुप्ता, गौरव देव, अंकुश कर्चे पोलीस अंमलदार रविंद्र चिप्पा, गणेश भोसले, नरेंद्र महांगरे, अवधुत जमदाडे, अभिनय चौधरी, मितेश चोरमोले, विक्रम सावंत, हर्षल शिंदे, धनाजी धोत्रे, राहुल तांबे, अभिजित जाधव, सचिन सरपाले, निलेश खैरमोडे, सचिन गाडे, तुळशीराम टेभुर्णे, रविंद्र भोरडे व राहुल शेडगे यांचे पथकाने यांनी केली आहे.

